# महिला साहाय्य कक्षात राबविण्यात येणारे इतर उपक्रम

**समितीच्या बैठकीचे दिवस वगळता आलेली प्रकरणे माननीय पोलीस अधीक्षकांकडे किंवा प्रभारी अधिकाऱ्यांकडे नेली जातात. अर्जदार व गैरअर्जदारांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यांच्या तीव्र वाद मिटविले जातात. यासाठी वरिष्ठांकडून चर्चा/समुपदेशन केले जाते. अशा प्रकारे ही अनेक प्रकरणे सोडविण्यात येतात.**

१) महिला अत्याचारांच्या प्रकरणांमध्ये पीडित महिलेला आवश्यक ती मदत करण्याचा प्रयत्न केला जातो. पीडित महिलेला समुपदेशनाद्वारे सक्षम बनविण्याबरोबर तिच्यामध्ये कायदेविषयक जनजागृती निर्माण केली जाते. महिला अत्याचारांच्या प्रकरणी कडक कायदेशीर कारवाई करण्याचे सर्वतोपरी प्रयत्न केले जातात.

२) गावात जिथे जिथे महिलांविषयक गंभीर गुन्हे घडतात त्यांचा तातडीने पाठपुरावा करण्यात येतो.

३) महिला साहाय्य कक्षात येणाऱ्या गंभीर प्रकरणांमध्ये गरज भासल्यास घटनास्थळी भेट देऊन (Spot Visit) पीडित महिलेला मानसिक व भावनिक आधार देण्याचा प्रयत्न केला जातो.

४) माननीय पोलीस अधीक्षकांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली महिलांच्या पोटगी संबंधित समन्स व वॉरंट यांची कडक अंमलबजावणी करण्यात येते. त्यामुळे कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडलेल्या महिलांना तसेच त्यांच्या मुलांना ताबडतोब पोटगी मिळण्यास मदत होते. न्यायालयाकडून अत्याचार पीडित महिलेस न्याय दिला जातो.

५) प्रत्येक जिल्ह्यात Monthly Crime Meeting मध्ये महिला साहाय्य कक्षातील अधिकाऱ्यांकडून महिला अत्याचारांच्या गुन्ह्यांवर विशेष लक्ष दिले जाते.

६) पोलीस कर्मचाऱ्यांसाठी असणाऱ्या सेवाअंतर्गत प्रशिक्षणामध्ये महिला अत्याचार या विषयावर प्रशिक्षण दिले जाते.

७) जागतिक महिलादिनाच्या निमित्ताने दरवर्षी विविध उपक्रम जिल्हा पोलीस दलाच्या वतीने घेण्यात येतात. ज्यामध्ये प्रामुख्याने महिला पोलिसांचे पथसंचलन, पोलीस ठाणे, पातळीवर महिला कर्मचाऱ्यांना विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या देणे, मान्यवरांची व्याख्याने, महिलांच्या कार्यशाळा, विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या महिलांचे सत्कार इत्यादी अनेकविध कार्यक्रम हाती घेतले जातात.

८) **औरंगाबाद जिल्ह्यांसाठी महिला व मुलींसाठी हेल्पलाईन नंबर ०२४०-२३९२१०० तसेच ९७६३७७६६४४ ही मोबाईल सेवा सुरू करण्यात आली आहे.** त्यामुळे अत्याचारग्रस्त पीडित महिलेस पोलिसांशी तात्काळ साधता येतो. पोलिसांकडून आवश्यक ती कायदेशीर मदत अत्याचारग्रस्त महिलेस देण्यात येते. त्या क्षेत्रात एखाद्या महिलेवर अत्याचार घडला असेल त्या क्षेत्रातील पोलीस ठाण्यात आणि नियंत्रण कक्षात तात्काळ माहिती देऊन संबंधित महिलेस आवश्यक ती मदत दिली जाते.

९) ग्रामीण भागामध्ये बहुतांश महिला वर्गाला कायदेविषयक बाबींचे ज्ञान नसते. त्यामुळे त्यांच्यावर होणारा अन्याय सहन करीतच ती जगत असते. ग्रामीण भागातील जनतेला महिलाविषयक कायद्यांचे ज्ञान व्हावे आणि गुन्हा केल्यानंतर शिक्षेची काय तरतूद असते याची जाणीव व्हावी. म्हणून खेडेगावांत होणाऱ्या जत्रेत महिला साहाय्य कक्षातर्फे ग्रामीण भागातील स्त्रियांना कायद्याचे ज्ञान व्हावे म्हणून पोस्टर्सचे प्रदर्शन भरविण्याची योजना काही ठिकाणी राबविण्यात आली. या प्रदर्शनामध्ये महिलांविषयक कायदे व त्यातील शिक्षेबद्दलची माहिती, अंधश्रद्धा निर्मूलन, स्त्री-भ्रूणहत्या, व्यसन मुक्ती, तंटामुक्ती इत्यादी अनेक विषयांवरची पोस्टर्स जनजागृतीसाठी लावली जातात. महिला साहाय्य कक्षाचे कर्मचारी प्रदर्शन पाहण्यासाठी आलेल्या प्रेक्षकांच्या शंकांचे निरसन करतात.

१०) काही जिल्ह्यांत महिला, मुले, ज्येष्ठ नागरिक यांना मदत करण्यासाठी **हेल्पलाईन** सुरू करण्यात आली आहे.

**११)** ग्रामीण भागात एखाद्या दुर्गम खेड्यात स्त्रीवर अत्याचार झाला तर तिला जिल्ह्याच्या ठिकाणी येणे प्रत्येक वेळेस शक्य नसते. त्यासाठी तालुका स्तरावर पोलीस ठाण्यात समुपदेशन केंद्रही स्थापन करण्याची सरकारी योजना आहे.

**१२)** हुंडा प्रतिबंधक कायदा, कौटुंबिक अत्याचार कायदा २००५ इत्यादी अनेक बाबतीत जनजागृती करण्यासाठी शहरात व जिल्ह्याच्या महत्त्वाच्या ठिकाणी जनतेला दिसतील अशा ठिकाणी पोस्टर्स लावण्यात येतात. तसेच महिला साहाय्य कक्षातही असे पोस्टर्स लावण्यात येतात. तक्रारदार महिलेस याचा निश्चित उपयोग होतो.

## महिला छेडछाड विरोधी पथक

ग्रामीण भागातील मुली शिक्षणासाठी पुढे येत आहेत, हि अत्यंत चांगली बाब आहे. मात्र ग्रामीण शिक्षणासाठी काही ठिकाणी राहत्या घरांपासून दूर जावे लागते. अशावेळेस मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो. शाळा महाविद्यालयात जाणे-येणे करण्यासाठी बस, ऑटोरिक्षा, जीप अशा वाहनांचा वापर होत असतो. अशा वेळेस मुलींना छेडछाड प्रकारांना सामोरे जावे लागते. त्यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशनला तसेच जिल्हा स्तरावर महिला छेडछाड विरोधी पथक स्थापन केले असून अशा शाळा, महाविद्यालयात जाणाऱ्या महिलांनात नव्हे तर गर्दीच्या ठिकाणी वावरणाऱ्या महिलांना सुद्धा याचा लाभ होत आहे.

**औरंगाबाद जिल्ह्यांसाठी महिला व मुलींसाठी हेल्पलाईन नंबर ०२४०-२३९२१०० तसेच ९७६३७७६६४४ ही मोबाईल सेवा सुरू करण्यात आली आहे. शाळा, महाविद्यालयातील मुली या क्रमांकावर आपली तकार मांडू शकतात.**

